**सी.एन.आर. नं. एमएचएसआय ०७ –०००५७८–२०१७**

**नि.दि.मु.क्र. ९१/२०१७ मधील नि.क्र.२५ वरील आदेश**

प्रस्तुतचा दावा वाटपाकरीता दाखल करण्यात आलेला आहे.

०२. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ याने त्याच्याविरुध्द नि.क्र. १ वर दावा विनाकैफियत चालविण्यात यावा असा झालेला आदेश रद्दबातल होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अर्जातील नमूद कारणांचा विचार होवून अर्ज मंजूर करण्यात यावा असे सदर प्रतिवादीतर्फे नमूद करण्यात आलेले आहे. वादीने प्रस्तुत अर्जावर थोडक्यात असे म्हणणे सादर केलेले आहे की, अर्ज अपुरा असून प्रतिवादी क्र. १ याच्याविरुध्द आदेश कोणत्या तारखेस झाला ते त्याने त्या नमूद केलेले नाही. अर्ज दाखल करण्यास किती विलंब झाला हे सुध्दा अर्जात नमूद करण्यात आलेले नाही. अर्ज चुकीचा असल्याने नामंजूर करण्यात यावा. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन अर्ज फेटाळण्याची विनंती वादीने केली आहे.

०३. उभयपक्षकारांतर्फे संपूर्ण युक्तिवाद ऐकला. अभिलेख व रोजनामा यांचे अवलोकन केले असता; नि.क्र. १ वर दावा प्रतिवादी क्र. १ याच्या कैफियतीशिवाय चालविण्यात यावा असा आदेश दि. २१/०६/२०१८ रोजी पारीत झालेला आहे. सदरील आदेश रद्दबातल होवून मिळणेसाठी प्रस्तुत प्रतिवादीने दि. २३/१०/२०१८ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. नि.क्र. १ वरील दावा विनाकैफियत चालविण्यात यावा असा झालेला आदेश रद्दबातल होवून मिळण्यासाठी प्रतिवादी क्र. १ याने अर्जात नमूद केलेली कारणे प्रथमदर्शनी संयुक्तिक वाटत नाहीत. तरीपरंतु, दाव्यातील वादीची मागणी लक्षात घेता, सदरील आदेश रद्दबातल करणे उचित राहील. प्रतिवादी क्र. १ याने कैफियत दाखल करण्यास केलेला विलंब पाहता; त्याच्यावर रक्कम रुपये २००/– इतका खर्च आकारुन व खर्चाची रक्कम वादीस देवविण्याचा आदेश करणे उचित राहील. करीता खालीलप्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येतो.

**आदेश**

१. अर्ज प्रतिवादी क्र. १ याच्यावर रक्कम रु. २००/– (रक्कम रुपये दोनशे मात्र) इतका खर्च आकारुन मंजूर करण्यात येतो.

२. नि.क्र. १ वरील दि. २१/०६/२०१८ रोजी प्रतिवादी क्र. १ याच्याविरुध्द दावा कैफियतीशिवाय चालविण्यात यावा असा झालेला आदेश रद्दबातल करण्यात येतो.

३. खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र. १ याने वादीस पुढील तारखेस अथवा तत्पुर्वी द्यावी. तसे न झाल्यास प्रस्तुतचा आदेश रद्दबातल करण्यात येईल.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला.)

सही/—

दिनांक : २० डिसेंबर, २०१८ (आर.आर.काळे)
ठिकाण :—मालवण. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर मालवण.